# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा मह ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वे दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित वमहाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

## परीक्षा व मुल्यमापन मंडळ विभाग

कॉम्पलेक्स परिसर,एम.आय.डी.सी. रोड,
गडचिरोली–४४२६०५

दूरध्वनी क्रमांक:कार्यालय: ०७१३२–२२३३२
ईमेल : director.boee@unigug.ac.in


जा. क्र. गों.वि./परिक्षा वि./ १४०५ /२०२५ दि:– २३ /०४/२०२५

## सुधारित परिपत्रक

प्रति,

मा. प्राचार्य/मा. विभाग प्रमुख, पदव्युत्तर शैक्षणिक विभाग/
संलग्नित सर्व महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**विषय:– २८ एप्रिल हा दिवस "सेवा हक्क दिन" म्हणून साजर करणेबाबत.**

संदर्भ:– १. क्र. संकिर्ण–२०२५/प्र.क्र.२७/मुसेहआ/कक्ष–२ दि. ०७ एप्रिल, २०२५.
२. क्र. कार्या–२/स.म.अ./भुसुधार/कावि/८१५/२०२५ दि. ०९/०४/२०२५.
प्राप्त पत्र दि.२१/०४/२०२५.

**महोदय,**

उपरोक्त संदर्भान्कित विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, दि. २८ एप्रिल, २०२५ रोजी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या अंमलबजावणीस १० वर्षे पूर्ण होत असल्याने, या दशकपूर्तीचे औचित्य साधून जिल्हास्तरावर तसेच ग्रामपातळीवर विशेष उपक्रम राबविण्याबाबत सूचित करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर दि. २८ एप्रिल, २०२५ रोजी आपण आपल्या महाविद्यालयामध्ये **"सेवा हक्क दिन"** तसेच महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या दशकपूर्तीचे औचित्य साधून महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाच्या व्यापक व प्रचार व प्रसिध्दीसाठी आपल्या महाविद्यालयाचा सहभाग घेऊन दि. २८ एप्रिल, २०२५ रोजी व्यापक स्वरुपात विविध उपक्रम रावबून व कार्यक्रमांचे आयोजन करुन हा दिवस जनसहभागासह साजरा करावा.

ग्रामपातळीवर व जिल्हापातळीवर आयोजित करावयाच्या उदाहरणादाखल कार्यक्रमांचा तपशिल प्रपत्र – अ आणि ब मध्ये दिलेला आहे. सदर पत्रास अनुसरुन कार्यवाहीचा अनुपालन अहवाल विद्यापीठास दि. १५ मे, २०२५ पर्यंत पाठवावे.

**सहपत्र:–** वरील संदर्भिय पत्रे.

23/04/2025

(डॉ. प्रविण पोटदुखे)
संचालक
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

**प्रतिलीपी:–** १. मा. मुख्य आयुक्त, राज्य मुख्य सेवा हक्क आयोग मंत्रालय, मुंबई.
२. मा. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांना माहितीस सविनय सादर.
३. मा. आयुक्त, राज्य मुख्य येचस हक्क आयोग, नागपूर यांना माहितीस सविनय सादर.
४. मा. जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली. यांना माहितीस्तव सविनय सादर.
५. मा. कुलसचिव गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीस्तव सविनय सादर.

जिल्हाधिकारी गडचिरोली यांचे कार्यालय

कॉम्प्लेक्स परिसर, चंद्रपूर रोड गडचिरोली पिन कोड क्रमांक - 442605

Email Id- rdcgadchiroli@gmail.com

क्र.कार्या-2/स.म.अ/भुसूधार/कावि/ 815 /2025 दिनांक 09 एप्रिल, 2025

प्रति,

सर्व माननीय

1) पोलीस अधीक्षक गडचिरोली
2) वनसंरक्षक, (प्रादेशिक) वनविभाग गडचिरोली
3) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास विभाग गडचिरोली/अहेरी/भामरागड
4) अधिक्षक अभियंता, सा.बां.मंडळ गडचिरोली
5) अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क गडचिरोली
6) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी गडचिरोली
7) जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख गडचिरोली
8) जिल्हा नियोजन अधिकारी,गडचिरोली
9) कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी गडचिरोली
10) उपप्रादेशक, परिवहन अधिकारी (RTO) गडचिरोली
11) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र गडचिरोली
12) जिल्हा पुरवठा अधिकारी, गडचिरोली
13) कुलसचिव, गोंडवाना विद्यापिठ गडचिरोली
14) उपायुक्त, पशुसंवर्धन गडचिरोली
15) सहायक संचालक, नगररचना गडचिरोली
16) सह जिल्हा निबंधक वर्ग-1 तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, गडचिरोली
17) सहायक आयुक्त, कौशल्य विकास गडचिरोली
18) जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व प्राधिकरण गडचिरोली
19) सह आयुक्त, अन्न व औषध प्रशासन अधिकारी, गडचिरोली
20) विक्रीकर अधिकारी, गडचिरोली
21) वरिष्ठ भुवैज्ञानिक, भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, गडचिरोली
22) जिल्हा माहिती अधिकारी, गडचिरोली
23) जिल्हा सह आयुक्त, नगरपालिका प्रशासन गडचिरोली
24) जिल्हा शल्यचिकित्सक, सामान्य रुग्णालय, गडचिरोली
25) जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, कार्यालय, गडचिरोली
26) सहायक आयुक्त, मत्स्यविभाग, गडचिरोली
27) जिल्हा कामगार आयुक्त, गडचिरोली
28) जिल्हा कोषागार अधिकारी, गडचिरोली
29) जिल्हा निबंधक, सहकारी संस्था गडचिरोली
30) सहा. आयुक्त समाजकल्याण गडचिरोली
31) विभाग नियंत्रक, एस.टी महामंडळ गडचिरोली
32) जिल्हा सांख्यिकी अधिकारी, गडचिरोली
33) जिल्हा खनिकर्म विभाग गडचिरोली
34) जिल्हा दुग्धव्यवसाय अधिकारी, गडचिरोली
35) जिल्हा क्रिडा अधिकारी, गडचिरोली
36) धर्मदाय आयुक्त, गडचिरोली

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
परीक्षा व मुल्यमापन मंडळ यांचे कार्यालय
आवक क्र. 19907 दि. 15/4/25
जावक क्र. 19907 दि. 15/4/25

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. 2619 दि. 15/4/25
जावक क्र. 3278 दि. 15/4/25

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
[illegible] विभाग
आवक क्र. 1538 दि. 15/04/25

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
परीक्षा व मुल्यमापन मंडळ यांचे कार्यालय
आवक क्र. 1573 दि. 16/4/25
जावक क्र. दि.

Ku. Kamble
Shri Pareddiwar
cc 4/4/025

परिक्षा विभाग 15/4/25

कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

cc Shri Dinesh Narote

15.04.2025

विषय:- 28 एप्रिल हा दिवस "सेवा हक्क दिन" म्हणून साजरा करणेबाबत

संदर्भ:- मा. सह सचिव, महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग मुंबई यांचे पत्र क्र.संकिर्ण-2025/प्र.क्र.27/मुसेहआ/कक्ष-2 दिनांक 07 एप्रिल, 2025

उपरोक्त विषयांकित संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, शासनाने, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.GAD/94/2024-Lokshahidin, दि.01 एप्रिल, 2025 निर्गामित करून 28 एप्रिल हा दिवस "सेवा हक्क दिन" म्हणून साजरा करण्यास मान्यता दिली आहे. तसेच या कार्यालयाचे पत्र क्र.बैठक-2025/प्र.क्र.21/मुसेहआ/कक्ष-2, दि.01.04.2025 (प्रत संलग्न) च्या अन्वये दि.28 एप्रिल, 2025 रोजी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, 2015 च्या अंमलबजावणीस दहा वर्ष पूर्ण होत असल्याने, या दशकपूर्तीचे औचित्य साधून जिल्हास्तरावर तसेच ग्रामपातळीवर विशेष उपक्रम राबविण्याबाबत सूचित करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर दि. 28 एप्रिल, 2025 रोजी आपण आपल्या जिल्ह्यामध्ये/तालुकास्तरावर "सेवा हक्क दिवस" तसेच महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, 2015 च्या दशकपूर्तीचें औचित्य साधून विविध उपक्रम राबवून हा दिवस जनसहभागासह साजरा करावा व नागरिकांमध्ये उक्त अधिनियमाबाबत, राज्य सेवा हक्क आयोगाबाबत तसेच आपले सरकार पोर्टल मार्फत ऑनलाईन उपलब्ध सेवांबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी प्रयत्न करावेत. या अनुषंगाने ग्रामपातळीवर आयोजित करावयाच्या उदाहरणादाखल कार्यक्रमांचा तपशिल सोबत जोडलेल्या प्रपत्र-अ मध्ये व जिल्हापातळीवर आयोजित करावयाच्या उदाहरणादाखल कार्यक्रमांचा तपशिल प्रपत्र- ब मध्ये दिला आहे.

त्याअनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, यासोबत संलग्न करण्यात आलेले प्रपत्र- अ, प्रपत्र-ब तसेच यासोबत संलग्न करण्यात आलेल्या पत्रानूसार, आपले कार्यालयाशी संबधित बाबीविषयी कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयात सादर करावा.

सहपत्र:- वरीलप्रमाणे

(सुनिल सुर्यवंशी)
निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय,गडचिरोली

प्रतिलिपी:-
1. मा. मुख्य आयुक्त, राज्य मुख्य सेवा हक्क आयोग मंत्रालय मुंबई यांना माहितीस सविनय सादर
2. मा. विभागीय आयुक्त नागपूर विभाग नागपूर यांना माहितीस सविनय सादर.
3. मा.आयुक्त, राज्य मुख्य सेवा हक्क आयोग, नागपूर यांना माहितीस सविनय सादर

8.4.25
निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय,गडचिरोली

राज्य सेवा हक्क आयोग
नवीन प्रशासन भवन, ७ वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई- ४०० ०३२
आपली सेवा आमचे कर्तव्य
ई-मेल :-ccrts@maharashtra.gov.in
दुरध्वनी :-०२२-२२८३२३४६

क्र. संकिर्ण-२०२५/प्र.क्र.२७/मुसेहआ/कक्ष-२

दिनांक :- ०७ एप्रिल, २०२५

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद

विषय:- २८ एप्रिल हा दिवस "सेवा हक्क दिन" म्हणून साजर करणेबाबत.
संदर्भ :- सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.GAD/९४/२०२४-Lokshahidin, दि.०१ एप्रिल, २०२५

महोदय,

शासनाने, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.GAD/९४/२०२४-Lokshahidin, दि.०१ एप्रिल, २०२५ निर्गमित करून २८ एप्रिल हा दिवस "सेवा हक्क दिन" म्हणून साजरा करण्यास मान्यता दिली आहे. तसेच या कार्यालयाचे पत्र क्र.बैठक-२०२५/प्र.क्र.२१/मुसेहआ/कक्ष-२, दि.०१.०४.२०२५ (प्रत संलग्न) च्या अन्वये दि.२८ एप्रिल, २०२५ रोजी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या अंमलबजावणीस दहा वर्ष पूर्ण होत असल्याने, या दशकपूर्तीचे औचित्य साधून जिल्हास्तरावर तसेच ग्रामपातळीवर विशेष उपक्रम राबविण्याबाबत सूचित करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर दि.२८ एप्रिल, २०२५ रोजी आपण आपल्या जिल्ह्यामध्ये "सेवा हक्क दिवस" तसेच महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या दशकपूर्तीचे औचित्य साधून विविध उपक्रम राबवून हा दिवस जनसहभागासह साजरा करावा व नागरिकांमध्ये उक्त अधिनियमाबाबत, राज्य सेवा हक्क आयोगाबाबत तसेच आपले सरकार पोर्टल मार्फत ऑनलाईन उपलब्ध सेवांबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी प्रयत्न करावेत. या अनुषंगाने ग्रामपातळीवर आयोजित करावयाच्या उदाहरणादाखल कार्यक्रमांचा तपशिल सोबत जोडलेल्या प्रपत्र-अ मध्ये व जिल्हापातळीवर आयोजित करावयाच्या उदाहरणादाखल कार्यक्रमांचा तपशिल प्रपत्र-ब मध्ये दिला आहे.

वरीलप्रमाणे कार्यवाही करून अनुपालन अहवाल आयोगास दि.१५ मे, २०२५ पर्यंत पाठवावा.

आपली विश्वासू,

(वैशाली राज चव्हाण (निर्धार))
सह सचिव,
महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग

प्रत- १. सर्व राज्य सेवा हक्क आयुक्त
२. सर्व विभागीय आयुक्त (महसूल)

कृपया सदर पत्रास अनुसरून आपल्या विभागातील सर्व जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी "सेवा हक्क दिवसाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमांची उत्स्फुर्तपणे अंमलबजावणी करण्यासाठी आपण सत्वर समक्षात किंवा व्ही.सी. द्वारे बैठका घेऊन त्यांना मार्गदर्शन करावे व सदर दिवस यशस्वीरीत्या साजरा होईल. यासाठी आपण जातीने लक्ष द्यावे, ही विनंती.

प्रपत्र —अ

| अ.क्र. | सेवा हक्क दिनाच्या निमित्ताने ग्रामपंचायत स्तरावर आयोजित करावयाचे कार्यक्रम |
|---|---|
| १ | दि.२८.०४.२०२५ रोजी सर्व ग्रामपंचायतींमध्ये ग्रामपंचायतीच्या विशेष सभेचे आयोजन करणे, त्यात महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या प्रती सर्व ग्रामपंचायत सदस्यांना देणे व उक्त कायद्याच्या ठळक तरतूदींचे वाचन करणे. (नमूना संलग्न) |
| २ | प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत विहित सूचना फलक या पूर्वी लावले नसल्यास तसे माहिती फलक लावणे. (नमूना संलग्न) |
| ३ | प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये अधिसूचित सेवांची व शुल्कांची माहिती देणारा QR CODE लावणे. |
| ४ | प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये तक्रार नोंदवण्यासाठी QR CODE लावणे. |
| ५ | ग्रामविकास विभागाने निर्गमित केलेल्या शासन निर्णय क्र.आरटीएस-३८२४/प्र.क्र.८९/मातंक, दि.२८ जानेवारी, २०२५ प्रमाणे ग्रामपंचायत स्तरावरील आपले सरकार सेवा केंद्रांमार्फत अधिसूचित करण्यात आलेल्या सर्व ऑनलाईन सेवा नागरिकांना उपलब्ध करून देण्याची सुरूवात करणे. |
| ६ | ग्रामपंचायत स्तरावर उभारावयाच्या आदर्श आपले सरकार सेवा केंद्राचे उद्घाटन/ कोनशिला समारंभ दि.२८.०४.२०२५ रोजी आयोजित करणे. |

## प्रपत्र –ब

| अ.क्र. | सेवा हक्क दिनाच्या निमित्ताने जिल्हा स्तरावर आयोजित करावयाचे कार्यक्रम |
|---|---|
| १ | जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालयात दि.२८.०४.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता सर्व पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिलीय प्राधिकारी व सर्व संबंधित कर्मचारी/ अधिकारी यांनी सेवेची बांधिलकी मानणारी शपथ घेणे. (शपथेचा नमूना संलग्न) |
| २ | "सेवा हक्क दिवसा" च्या अनुषंगाने मा. पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यातील सर्व मा. खासदार, मा. आमदार, इतर लोकप्रतिनिधी, स्वयंसेवी संस्था, पत्रकार, नागरिक यांचे उपस्थितीत समारंभाचे आयोजन करणे. सदर कार्यक्रमांतर्गत -<br>i. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०२५ ची वैशिष्ट्ये विषद करणे.<br>ii. विविध विभागांच्या सेवा देण्याच्या कामाचा आढावा सादर करणे.<br>iii. उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकाऱ्यांचा गौरव करणे. |
| ३ | आदर्श आपले सरकार केंद्राचे उद्घाटन/ कोनशिला समारंभ दि.२८.०४.२०२५ रोजी आयोजित करणे. |
| ४ | जिल्ह्यात सेवादूत योजना सुरू करणे. |
| ५ | सर्व आपले सरकार केंद्र व सर्व शासकीय कार्यालयात सेवांची व शुल्कांची माहिती देणारा QR CODE लावणे. (सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.आसेकें-१७२५/प्र.क्र.८६/मातं(३९), दि.२७ मार्च २०२५ प्रमाणे) |
| ६ | दि.२८.०४.२०२५ रोजी नागरिकांना SMS व्दारा महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाबाबत व आपले सरकार पोर्टलबाबत अवगत करणे. (यासाठी जिल्हा सेतू मधील निधीचा वापर करता येईल.) (SMS चा नमूना संलग्न) |
| ७ | जिल्ह्यातील गर्दीचे ठिकाणी जसे की, आठवडी बाजार , पर्यटन स्थळे, तीर्थ स्थळे, इत्यादी ठिकाणी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ विषयी माहिती फलक (QR कोडसह) प्रदर्शित करणे. |
| ८ | विद्यार्थी/ महिला/ इतर घटक यांचेशी सदर कायद्याविषयी सुसंवाद साधून सदर कायद्याविषयी जनजागृती करण्याच्या दृष्टीने दि.२८.०४.२०२५ रोजी मेळाव्यांचे आयोजन करणे. |
| ९ | शालेय/ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५, राज्य सेवा हक्क आयोग व आपले सरकार पोर्टल या संदर्भात दि.२८.०४.२०२५ रोजी निबंध स्पर्धा/वक्तृत्व स्पर्धा परिसंवाद इ. चे आयोजन करणे. |
| १० | महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाच्या व्यापक व प्रचार व प्रसिध्दी साठी भारत स्काउट, एन.सी.सी. व एन.एस.एस. च्या विद्यार्थ्यांचा सहभाग घेऊन दि.२८.०४.२०२५ रोजी व्यापक स्वरूपात कार्यक्रमांचे आयोजन करणे. |
| ११ | महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५च्या प्रचारासाठी समाज माध्यमांचा वापर सुरू करणे. |
| १२ | महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५च्या प्रचारासाठी पथनाट्य, नाटके, गाणे, लोककलांचा वापर सुरू करणे. |
| १३ | सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.आसेकें-१७२५/प्र.क्र.८६/मातं(३९), दि.२७ मार्च २०२५ अन्वये नवीन आपले सरकार सेवा केंद्रांचे उद्घाटन/ कार्यान्वयन करणे. |

महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग
राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त कार्यालय,
नवीन प्रशासन भवन, ७ वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई- ४०० ०३२

आपली सेवा आमचे कर्तव्य
ई-मेल :-ccrts@maharashtra.gov.in

दुरध्वनी :- ०२२-२२८३१३४६

दिनांक :- ०१ एप्रिल, २०२५

क्र. बैठक-२०२५/प्र.क्र.२१/मुसेहआ/कक्ष-२

प्रति,

सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद

विषय :- महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या अंमलबजावणी दशकपूर्ती झाल्याचे औचित्य साधून आपल्या जिल्ह्यात विशेष कार्यक्रम आखण्याबाबत.

महोदय/ महोदया,

महाराष्ट्र राज्यात पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याकरिता आणि पात्र व्यक्तींना लोकसेवा देणाऱ्या शासकीय विभागांमध्ये व अभिकरणांमध्ये आणि इतर सार्वजनिक प्राधिकरणांमध्ये पारदर्शकता आणि उत्तरदायित्त्व आणण्यासाठी आणि तद्अनुषंगिक बाबींकरीता महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ हा राज्यभरात दि.२८ एप्रिल, २०१५ पासून लागू करण्यात आला आहे. दि.२८ एप्रिल, २०२५ रोजी सदर कायद्याचे अंमलबजावणीस होणाऱ्या दशकपूर्तीच्या औचित्य साधून आपण आपल्या जिल्ह्यामध्ये सदर कायद्याची जाहिरात व प्रसिध्दी करून जनजागृती करण्याच्या दृष्टीने कृपया पुढीलप्रमाणे उदाहरणादाखल दिलेल्या कार्यक्रमांची आखणी करावी :-

i. ज्या जिल्ह्यांमध्ये आदर्श आपले सरकार सेवा केंद्र उभारण्यात आले असतील त्यांचा लोकार्पण सोहळा तसेच जेथे नवीन आदर्श आपले सरकार सेवा केंद्र उभारणे निश्चित करण्यात आले असेल अशा ठिकाणी पायाभरणी किंवा कोणशिला कार्यक्रम दि.२८/०४/२०२५ रोजी आयोजित करणे.

ii. गर्दीचे ठिकाणी जसे की, आठवडी बाजार, पर्यटन स्थळे, तीर्थ स्थळे इत्यादी ठिकाणी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ विषयी माहिती फलक (QR कोडसह) उभारणे.

iii. शासकीय कार्यालयांमध्ये महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमांन्वये विहित माहिती डिजीटल बोर्डवर (QR कोडसह) प्रदर्शित करणे.

iv. वर्ष २०२४-२५ साठी विहित कालावधीत अधिसूचित सेवा पुरविण्याचे प्रमाण १००% असणाऱ्या अशा अधिकारी/ कर्मचारी यांचा दि.२८ एप्रिल, २०२५ किंवा दि.१ मे, २०२५ रोजी यथोचित सन्मान करणे.

v. विद्यार्थी/ महिला यांचेशी सदर कायद्याविषयी सुसंवाद साधून सदर कायद्याविषयी जनजागृती करण्याच्या दृष्टीने दि.२८/०४/२०२५ रोजी मेळाव्यांचे आयोजन करणे.

vi. दि.१ मे, २०२५ रोजी महाराष्ट्र दिनी आयोजित करण्यात येणाऱ्या ग्राम सभांमध्ये सदर कायद्याच्या ठळक तरतूदींचे वाचन करणे.



Scanned with CamScanner

ग्रामीण [illegible] निर्गमित केलेल्या शासन निर्णय क्र. [illegible] दि. [illegible] २०२५ प्रमाणे ग्रामपंचायत स्तरावरील सर्व [illegible] अधिसूचित करण्यात आलेल्या सर्व ऑनलाईन सेवा नागरिकांना उपलब्ध करून देण्याची सुरुवात दि.१ मे, २०२५ पासून करणे.

या व्यतिरिक्त या संदर्भात आपल्या काही नाविन्यपूर्ण संकल्पना असल्यास आयोगास त्याबाबत अवगत करावे जेणेकरून त्यानुसार इतर जिल्ह्यांमध्येही तशा उपक्रमांची अंमलबजावणी करणे सुलभ होईल. कृपया सदर पत्रास अनुसरून आपल्या जिल्ह्यात राबविणार असलेल्या कार्यक्रमाची रूपरेषा दि.१५ एप्रिल, २०२५ पर्यंत आयोगास सादर करावी, ही विनंती.

मा. मुख्य आयुक्त यांच्या मान्यतेने.

आपली विश्वासू,

(वैशाली राज चव्हाण (निर्धार))
सह सचिव
महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग

## महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ ची उद्दिष्टे आणि ठळक वैशिष्ट्ये :-

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ हा एक क्रांतीकारी कायदा असून त्यामध्ये अनेक वैशिष्ठ्ये आहेत जी इतर राज्यांच्या तद्अनुषंगिक कायद्यांपेक्षा वेगळी आहेत. लोकसेवा वितरित करताना खालील बाबी साध्य करण्याचा या कायद्याचा उद्देश आहे-

- पारदर्शकता
- उत्तरदायित्व
- कालबध्दता
- कार्यक्षमता

डिजिटल मंचाचा उपयोग करुन लोकसेवा वितरणामध्ये सक्षमता व पारदर्शकतेच्या संस्कृतीस चालना देण्यावर या कायद्याचा भर आहे. नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सार्वजनिक सेवांचा दर्जा उंचावणे व त्या विहित कालावधीत व जबाबदारीपुर्वक पुरविल्या जातील याची खात्री करणे हे या कायद्याचे प्राथमिक उद्दिष्ट आहे.

- महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या कलम ३ नुसार, प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरण या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या कालावधीच्या आत आणि त्यानंतर वेळोवेळी ते पुरवीत असलेल्या लोकसेवा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपीलीय प्राधिकारी आणि द्वितीय अपीलीय प्राधिकारी यांचा तपशील आणि नियत कालमर्यादा या अधिनियमाखाली अधिसूचित करील. (कलम -३)
- प्रत्येक पात्र व्यक्तीस (कायदेशीर, तांत्रिक, आर्थिक व्यवहार्यतेच्या अधीन राहून) या अधिनियमानुसार राज्यातील लोकसेवा नियत कालमर्यादेच्या आत प्राप्त करण्याचा हक्क असेल. (कलम-४)
- महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ नुसार कोणतीही अधिसूचित लोकसेवा मिळविण्यासाठी कोणत्याही पात्र व्यक्तीस पदनिर्देशित अधिकाऱ्याकडे अर्ज करता येईल. असा अर्ज निकाली काढण्यासाठी नियत केलेल्या कालमर्यादेसह, अर्ज मिळाल्याचा दिनांक एका विशिष्ट अर्ज क्रमांकासह अर्जदारास देण्यात येईल. (कलम -५)
- प्रत्येक अर्जदार त्याला प्रदान केलेल्या विशिष्ट अर्ज क्रमांकासह त्याच्या ऑनलाइन अर्जाच्या स्थितीची पाहणी करू शकतो. (कलम -६)
- उक्त अधिनियमानुसार कोणतीही पात्र व्यक्ती ज्याचा अर्ज फेटाळला गेला आहे किंवा ज्याला नियत कालमर्यादेच्या आत लोकसेवा प्रदान केली गेली नसेल अशी कोणतीही पात्र व्यक्ती, अर्ज फेटाळल्याचा आदेश मिळाल्याच्या किंवा नियत कालमर्यादा समाप्त झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या कालावधीच्या आत प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याकडे अपील दाखल करू शकते. {कलम -९ (१)}
- प्रथम अपीलीय प्राधिकारी, आपल्या आदेशात पात्र व्यक्तीला सेवा देण्यासाठी पदनिर्देशित अधिकाऱ्याला निर्देश देऊ शकतात किंवा त्यास अपील दाखल केल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या कालावधीच्या आत अपील फेटाळण्याची कारणे लेखी नमूद करून अपील फेटाळू शकतात. {कलम -९ (२)}
- प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या आदेशाविरुद्ध अर्जदार, प्रथम अपील प्राधिकाऱ्याचा आदेश प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांच्या कालावधीत द्वितीय अपीलीय प्राधिकाऱ्याकडे द्वितीय अपील दाखल करू शकतो. {कलम -९ (३)}
- पदनिर्देशित अधिकारी पुरेशा आणि वाजवी कारणाशिवाय लोकसेवा प्रदान करण्यात अयशस्वी झाल्यास, रु. ५००/- पेक्षा कमी नसेल परंतू ५०००/- रूपयांपर्यंत असू शकेल एवढी शास्ती संबंधित पदनिर्देशित अधिकाऱ्यावर लादली जाऊ शकते. (कलम -१०)

- संबंधित पदनिर्देशित अधिकारी किंवा प्रथम अपीलीय प्राधिकारी संबंधित अपीलीय प्राधिकारी किंवा आयोगाकडून असे पत्र प्राप्त झाल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या कालावधीच्या आत दंडाची रक्कम भरतील. असे करण्यात कसूर केल्यास दंडाची रक्कम त्यांच्या वेतनातून वसूल केली जाईल. (कलम -११)
- लोकसेवा प्रदान करण्यात संबंधित पदनिर्देशित अधिका-याकडून वारंवार कसूरीबद्दल किंवा विलंब झाल्याबद्दल द्वितीय अपीलीय प्राधिकाऱ्याकडून सूचना प्राप्त झाल्यानंतर, सक्षम अधिकाऱ्याने संबंधित पदनिर्देशित अधिकाऱ्याविरुद्ध शिस्तभंगाची कार्यवाही सुरू करणे संकल्पित आहे. (कलम -१२)
- महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ नुसार बहु-सदस्यीय आयोग घटित करण्याची तरतूद आहे. या अधिनियमाच्या उचित अंमलबजावणीची सुनिश्चिती करणे व अधिक चांगल्यारितीने लोकसेवा देण्याची सुनिश्चिती करण्याकरिता राज्य शासनाला सूचना करणे हे, आयोगाचे कर्तव्य आहे. (कलम -१६)
- राज्य शासन, कलम १६ मधील पोट-कलम (१) च्या खंड (ग), (घ) आणि (ङ) अन्वये, आयोगाने केलेल्या शिफारशींचा विचार करील आणि केलेल्या कार्यवाहीची माहिती, तीस दिवसांच्या आत किंवा आयोगाशी विचारविनिमय करून ठरविण्यांत येईल अशा त्यानंतरच्या कालावधीत, आयोगाकडे पाठवील. (कलम -१७)
- द्वितीय अपीलीय प्राधिकाऱ्याच्या आदेशामुळे व्यथित झालेल्या पात्र व्यक्तीस किंवा पदनिर्देशित अधिकाऱ्यास, असा आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ६० दिवसांच्या कालावधीच्या आत आयोगाकडे अपील दाखल करता येईल. (कलम -१८)
- लोकसेवा मिळण्यासाठी पात्र व्यक्तींकडून विविध प्रमाणपत्रे, दस्तऐवज, शपथपत्रे, इत्यादी सादर करण्याबाबतची मागणी कमी करण्यासाठी सर्व सार्वजनिक प्राधिकरणे कालमर्यादित प्रभावी उपाययोजना करतील. सार्वजनिक प्राधिकरण, अन्य विभागाकडून किंवा सार्वजनिक प्राधिकरणांकडून थेटपणे आवश्यक माहिती प्राप्त करण्यासाठी समन्वयाने प्रयत्न करतील. {कलम २० (१)}
- द्वितीय अपीलीय प्राधिकाऱ्याकडून किंवा मुख्य आयुक्ताकडून, किंवा यथास्थिती, आयुक्ताकडून, पदनिर्देशित अधिकाऱ्याकडून होणाऱ्या वारंवार कसुरीबद्दल लेखी माहिती प्राप्त झाल्यावर, संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाचा प्रमुख, कसुरदार अधिकाऱ्यावर कारणे दाखवा नोटीस बजावून व त्याला आपले म्हणणे मांडण्याची संधी देऊन, तशा आशयाच्या निष्कर्षाची नोंद केल्यानंतर, योग्य ती प्रशासकीय कारवाई करण्यास सक्षम असेल. {कलम -२० (३)}
- पदनिर्देशित अधिकाऱ्याला प्रोत्साहन देण्यासाठी व त्याची कार्यक्षमता वाढविण्यासाठी, सार्वजनिक प्राधिकरणाच्या प्रमुखास, ज्याच्या विरुद्ध एका वर्षात कसुरीची कोणतीही नोंद करण्यात आलेली नसेल व जो नियत कालमर्यादेच्या आत लोकसेवा देत असेल अशा पदनिर्देशित अधिकाऱ्याला शासनाकडून अधिसूचित करण्यात येईल इतकी रोख रक्कम प्रोत्साहन म्हणून, प्रशस्ती प्रमाणपत्रासह, देता येईल, आणि तसेच, संबंधित अधिकाऱ्याच्या सेवा अभिलेखात त्याबाबतची नोंद देखील घेण्यात येईल. {कलम २० (५ क)}
- राज्य शासनास, या अधिनियमाची प्रयोजने साध्य करताना जी सार्वजनिक प्राधिकरणे उत्कृष्ट कामगिरी पार पाडतील अशा प्राधिकरणांचा गौरव करण्यासाठी योग्य पारितोषिके देता येतील. {कलम २० (५ ख)}
- जर पात्र व्यक्ती, अर्जात जाणून बुजून खोटी किंवा चूकीची माहिती देत असेल किंवा अर्जासोबत खोटे दस्तऐवज सादर करीत असेल आणि अशा माहितीच्या किंवा दस्तऐवजांच्या आधारे या अधिनियमाअन्वये लोकसेवा मिळवित असेल तर, अशा प्रकरणी, अंमलात असलेल्या दंडविधीच्या संबंधित तरतुदींअन्वये त्याच्या विरुद्ध कारवाई करण्यात येईल. (कलम -२३)

आपली सेवा आमचे कर्तव्य

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सूचना फलक

(महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५)

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ मधील तरतूदींनूसार अधिसूचित केलेल्या सेवांबाबत तपशिल

विभाग:-

कार्यालयाचे नाव :-

| अ.क्र. | अधिसूचित लोकसेवांचा तपशिल | लोकसेवा पुरविण्यासाठी विहीत केलेली कालमर्यादा | लोकसेवा पुरविण्यासाठी निर्धारित शुल्क | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिलीय प्राधिकारी | द्वितीय अपिलीय प्राधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |
| | | | | | | |

तृतीय व अंतिम अपिल राज्य सेवा हक्क आयुक्त, कोकण/ पुणे/ औरंगाबाद/ नाशिक/ अमरावती/ नागपूर यांचेकडे करता येईल. त्यांचा ई-मेल ______________________

दुरध्वनी ______________________

वेबसाईट : https://aaplesarkar.mahaonline.gov.in

कार्यालय प्रमुख

## सेवा हक्क दिवसाच्या अनुषंगाने सर्व अधिकारी/ कर्मचारी यांनी घ्यावयाची शपथ

मी, गांभीर्यपुर्वक शपथ घेतो की

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत शासनाच्या सेवा पारदर्शक पध्दतीने विहीत कालमर्यादेत व सौजन्याने पात्र नागरिकांना देण्याकामी मला सुपुर्द करण्यात आलेली जबाबदारी पूर्ण प्रामाणिकतेने, निष्ठेने, सचोटीने, संवेदनशीलतेने व तत्परतेने पार पाडण्यासाठी मी कटिबध्द राहीन.

मी, सेवा वितरण प्रक्रियेत कोणत्याही प्रकारचा विलंब, अडथळा किंवा भ्रष्टाचार होणार नाही यासाठी आवश्यक पावले उचलेन.

मी, उक्त कायद्याने नागरिकांना प्रदान केलेल्या सेवेच्या हक्काचा आदर ठेवून व नागरिकांविषयी सेवा भाव ठेवून त्यांच्या हितार्थ व कल्याणार्थ काम करेन.